International Online Multidisciplinary Journal
Review of Research
ISSN No : 2249-894X
Impact Factor 2.1002 (UIF) [Yr.2013]
3.1402 (UIF) [Yr.2014]
Save Tree. Save Paper. Save World

ISSN 2249-894X    Impact Factor : 3.1402 (UIF)    Volume - 5 | Issue - 4 | Jan - 2016





# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ-मेहकर तालुका

**संजय मोतीराम दांदडे**
**सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,**
**एम.ई.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय,**
**मेहकर जि. बुलडाणा.**

## प्रस्तावना :-

भारत हा कृषीप्रधान देश असून ४९.८ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उपजिविकेसाठी कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नातून शेतकरी कुटूबांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करणे अशक्य होत असून शेती निविष्ठांच्या सतत वाढणाऱ्या किंमती, ओला व कोरडा दुष्काळ, सिंचन सुविधेचा अभाव, वाढते मजूरीचे दर, वाहतूक व्यवस्था इ. कारणांमूळे गेल्या १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणेच्या काळात शेतकऱ्यांची अत्यंत दयनीय अवस्था भारतात पाहायला मिळत आहे. या वैफल्यग्रस्त हतबलतेत आत्मविश्वास हरवून बसलेला बळीराजा आत्महत्यासारखा मार्ग अवलंबित आहे. राष्ट्रीय सॅम्पल सर्व्हेच्या अहवालानुसार भारतात एकूण शेतकऱ्यांच्या संख्येपैकी ४८.६ टक्के शेतकरी कर्जबाजारी आहेत. भारतात सन १९९५ ते २०१६ या कालावधीत ३३२६६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, तेलंगाना व महाराष्ट्र या पाच राज्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक आहे. महाराष्ट्रात सन १९९५ ते २०१६ या कालावधीत ५३७११ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील विदर्भ विभागात सन १९९५ ते २०१५ या कालावधीतील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या १२, ४७५ इतकी आढळून आली. विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांशी शेकडा प्रमाण २३.२३ टक्के इतके होते.

## आत्महत्येची संकल्पना :-

आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य असून व्यक्तिबाहय घटकांचा दबाव पडत असतो.

एमिल दुर्खिम यांच्या मते, "व्यक्तिने स्वतः केलेल्या ज्या ज्या सकारात्मक किंवा नकारात्मक कृतीची परिणीती प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या व्यक्तीच्या मृत्यूत घडून येतो, असे सर्व मृत्यू म्हणजे आत्महत्या होय."

कोणत्या ना कोणत्या सामाजिक किंवा सामूहिक विघटनेमूळे आत्महत्या होतात. एकांत उपेक्षांची भावना किंवा सामाजिक अभावाचे ते प्रतिक असते. निराशा, व्यापारी अपयश, आर्थिक संकट, सामाजिक प्रतिष्ठा इ. मुळे आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होते.

'आत्महत्या' ही एक सार्वत्रिक व जूनी संकल्पना आहे. भारतीय साहित्यात, आत्महत्येच्या पाऊलखुणा मोठया प्रमाणात आढळून येतात. 'सती जाणे'व 'समाधी घेणे' हे सुद्धा आत्महत्येचे सार्वत्रिक उदाहरण आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरोच्या अहवालानुसार महाराष्ट्रात एकूण शेतकरी आत्महत्यांच्या ७० टक्के आत्महत्या एकटया विदर्भात होत आहेत. विशेषतः कापुस पिकविणाऱ्या भागातील शेतकरी मरणाला जवळ करीत असल्याचं विदारक चित्र पश्चिम विदर्भात दिसून येते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये बुलडाणा जिल्हयातील मेहकर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे सर्व्हेक्षण करून त्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन केलेले आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१) आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे

२) आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या प्रमुखाचे आत्महत्या करण्यामागची कारणे शोधणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शेधानिबंधासाठी प्राथमिक आणि दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला. विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून मेहकर तालुक्यातील काही निवडक ३० आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाची सहेतूक नमुना निवड पद्धतीने निवड केली आहे. दुय्यम सामग्रीमध्ये विविध संशोधनपर लेख, शासकीय अहवाल, वेबसाईटस् इ. चा आधार घेण्यात आला आहे. योग्य त्या ठिकाणी सांख्यिकीय तंत्र विश्लेषणाचा अवलंब करण्यात आला आहे.

**गृहीतके :**

१) आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे मुख्य कारण कर्जबाजारीपणा आहे.

२) मेहकर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबाची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे.

**मेहकर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटूंबाचे विश्लेषण :** मेहकर तालुक्यातील पात्र-२८ व अपात्र - ८१ अशा एकूण १०९ आत्महत्यांपैकी अभ्यासासाठी त्यातील ०५ स्त्री आणि २५ पुरूष अशा एकूण ३० आत्महत्याग्रस्त कुटूंबाची निवड केलेली असून त्यांच्याबाबतीत पुढीलप्रमाणे विश्लेषण दर्शविलेले आहे.

**तक्ता क्र.१**

**मेहकर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटूंबाचे विश्लेषण**

| अ. क्र. | तपशील | प्रतिसादक कुटुंब संख्या | प्रतिशत प्रमाण | अ. क्र. | तपशील | प्रतिसादक कुटुंब संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शैक्षणिक स्थिती** | | | | | | |
| | अ) निरक्षर | ०३ | १०.०० | ७ | **आत्महत्या करण्याची पद्धत** | | |
| | ब) प्राथमिक | १३ | ४३.३३ | | अ) झाडाला गळफास घेऊन | ११ | ३६.६७ |
| | क) माध्यमिक | ०७ | २३.२३ | | ब) विषारी औषध सेवन | १५ | ५०.०० |
| | ड) उच्च माध्यमिक | ०५ | १६.६७ | | क) तलाव/विहीरीत उडी घेऊन | ०४ | १३.३३ |
| | इ) पदवी | ०१ | ०३.३३ | | ड) जाळून घेऊन | ०० | ००.०० |
| | फ) पदव्यूत्तर | ०१ | ०३.३३ | | एकूण | ३० | १००.००% |
| | एकूण | ३० | १००% | ८ | **जमिनविषयक तपशील** | | |
| २ | **धार्मिक स्थिती** | | | | अ) २.५ एकर पर्यंत | ०९ | ३०.०० |
| | अ) हिंदू | २८ | ९३.३३ | | ब) २.५ एकर ते ५.०० एकर | १४ | ४६.६७ |
| | ब) बौद्ध | ०२ | ०६.६७ | | क) ५ एकर ते १० एकर | ०४ | १३.३३ |
| | क) शिख | - | - | | ड) १० एकर ते १५ एकर | ०३ | १०.०० |
| | ड) जैन | - | - | | एकूण | ३० | १००.००% |
| | इ) मुस्लीम | - | - | ९ | **आत्महत्येच्या वेळी विविध लोकांचे देणे** | | |
| | एकूण | ३० | १००% | | अ) मित्र | ०५ | १३.६७ |
| ३ | **वैवाहिक दर्जा** | | | | ब) नातेवाईक | ०४ | १३.३३ |
| | अ) विवाहित | १२ | ४०.०० | | क) सावकार | १२ | ४०.०० |
| | ब) अविवाहित | १० | ३३.३३ | | ड) बँका | ०७ | २३.३३ |
| | क) विदूर/ विधवा | ०८ | २६.६७ | | इ) इतर | ०१ | ०३.३३ |
| | एकूण | ३० | १००.०० % | | फ) उधारी नसणे | ०१ | ०३.३३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | **जात** | | | | एकूण | ३० | १००.००% |
| | अ) मराठा | ०६ | २०.०० | **१०** | **कर्ज (रू.)** | | |
| | ब) कुणबी | १४ | ४६.६७ | | अ) ४०००० रू. पर्यंत | ०७ | २३.३३ |
| | क) मातंग/महार | ०५ | १६.६७ | | ब) ४०००० रू. ते ६०००० रू. | १० | ३३.३३ |
| | ड) बंजारा | ०४ | १३.३३ | | क) ६०००० रू. ते ८००००रू. | ०६ | २०.०० |
| | इ) माळी | ०१ | ०३.३३ | **११** | **उत्पन्नाचा तपशील (वार्षिक) (रू.)** | | |
| | एकूण | ३० | १००.०० % | | अ) २५००० पेक्षा कमी | २४ | ८०.०० |
| ५ | **वयोगट** | | | | ब) २५००० रू. ते ३०००० रू. | ०३ | १०.०० |
| | अ) १८ वर्षे ते २५ वर्षे | ०४ | १३.३३ | | क) ३०००० रू. ते ३५००० रू. | ०१ | ३.३३ |
| | ब) २५ वर्षे ते ३५ वर्षे | १० | ३३.३३ | | ड) ३५००० रू. ते ५०००० रू. | ०१ | ३.३३ |
| | क) ३५ वर्षे ४५ वर्षे | ०७ | २३.२३ | | ई) ५०००० रू. ते ७५००० रू. | ०१ | ३.३३ |
| | ड) ४५ वर्षे ते ५५ वर्षे | ०७ | २३.२३ | | एकूण | ३० | १००.००% |
| | इ) ५५ वर्षे ते ६५ वर्षे | ०२ | ०६.६७ | **१२** | **वार्षिक उपभोग खर्च** | | |
| | एकूण | ३० | १००.०० % | | अ) २५००० ते पेक्षा कमी | ०९ | ३०.०० |
| ६ | **आत्महत्या करण्यामागची कारणे** | | | | ब) २५००० ते ३०००० रू. | ११ | ३६.६७ |
| | अ) व्यसनाधिनता | ०२ | ०६.६७ | | क) ३०००० रू. ३५००० रू. | ०४ | १३.३३ |
| | ब) घरगुती वाद | ०८ | २६.६७ | | ड) ३५००० रू. ते ५०००० रू. | ०३ | १०.०० |
| | क) न्यायालयीन खटले | ०३ | १०.०० | | ई) ५०००० रू. ७५००० रू. | ०३ | १०.०० |
| | ड) नापिकी | ०१ | ०३.३३ | | एकूण | ३० | १००% |
| | इ) कर्जबाजारीपणा | १४ | ४६.६७ | आधार : क्षेत्र पाहणी २०१५ (अनुसूचीवरून) | | | |
| | फ) मुलींचे लग्न | ०१ | ०३.३३ | | | | |
| | ग) सामाजिक प्रतिष्ठा | ०१ | ०३.३३ | | | | |
| | ह) इतर नातेसंबंध | - | - | | | | |
| | एकूण | ३० | १००% | | | | |

**निष्कर्ष :-**

मेहकर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटूंबातील उत्तरदात्यांकडून अनुसूचीच्या माध्यमातून गोळा केलेल्या समकांच्या आधारे पुढील निष्कर्ष आढळून आलेत.

१) उत्तरदात्याच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला असता, प्राथमिक शिक्षण घेतलेले १३ (४३.३३ टक्के) उत्तरदाते आहेत. पदव्यूत्तर उत्तरदाते केवळ एक असून त्याचे प्रतिशत प्रमाण ३.३३ टक्के दिसून येते.

२) उत्तरदात्यांची धार्मिक स्थिती अभ्यासली असता हिंदूंचे प्रमाण ९३.३३ टक्के इतके सर्वाधिक तर बौद्ध धर्मियांचे प्रमाण ६.६७ टक्के होते. इतर धर्मातील लोकांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले नाही.

३) ४० टक्के उत्तरदाते विवाहित ३३.३३ टक्के अविवाहित तर विदूर किंवा विधवा उत्तरदात्यांचे प्रमाण २६.६७ टक्के दिसून येते.

४) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील उत्तरदात्यांच्या जातीवरून असे स्पष्ट होते की, अभ्यासासाठी निवडलेल्या ३० कुटूंबापैकी मराठा आणि कुणबी जातीतील उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के आणि ४६.६७ टक्के इतके सर्वाधिक होते.

५) अभ्यासासाठी निवडलेल्या मेहकर तालुक्यातील ३० उत्तरदात्यांच्या वयोगटावरून असे स्पष्ट होते की, १८ ते ३५वर्षे या वयोगटातील आत्महत्या करणाऱ्यांचे प्रतिशत प्रमाण ४६.६७ टक्के होते.

६) आत्महत्याग्रस्त कुटूंबातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागची कारणे अभ्यासली असता, सर्वाधिक ४६.६७ टक्के कर्जबाजारीपणा, घरगुतीवाद (२६.६७ टक्के) तर इतर कारणांचे प्रतिशत प्रमाण २६.६६ टक्के आढळून आले. प्रस्तुत शोधानिबंधामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागचे प्रमुख कारण कर्जबाजारीपणा आहे. हे गृहीतक होते व ते सिद्ध होत आहे.

७) आत्महत्याग्रस्त निवडलेल्या कुटुंबातील शेतकऱ्यांची आत्महत्या करण्याच्या पद्धतीवरून असे लक्षात येते की, नमुना निवडीपैकी ११ शेतकऱ्यांनी (३६.६७ टक्के) झाडाला गळफास घेऊन तर विषारी औषध पिऊन आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण ५०.०० टक्के इतके सर्वाधिक आढळून आले.

८) निवडलेल्या उत्तरदात्यांच्या जमिनविषयक तपशीलावरून असे स्पष्ट होते की, २.५ ते ५ एकर जमीनधारकांची संख्या १४ (४६.६७ टक्के) होती. त्या खालोखाल अल्पभूधारकांची संख्या ०९ (३०.०० टक्के) होती. पाच एकराच्यावर जमिनधारकांचे प्रतिशत प्रमाण २३.३३ टक्के दिसून येते.

९) आत्महत्येच्या वेळी विविध लोकांची उधारी देण्याबाबत माहितीवरून असे स्पष्ट होते की, सावकाराचे देणे असणाऱ्यांचे प्रतिशत प्रमाण ४०.०० टक्के , राष्ट्रीयकृत बँका २३.३३ टक्के, मित्र व नातेवाईकांचे देणे अनुक्रमे १६.६७ व १३.३३ टक्के दिसून येते.

१०) आत्महत्याग्रस्त कुटूंबातील असलेला कर्जाच्या तपशीलावरून पुढील निष्कर्ष आला आहे की, ४०००० रू. पेक्षा कमी कर्ज असणाऱ्यांची संख्या ०७ (२३.३३ टक्के) , ४०००० रू. ते ८०००० रू. पर्यंत कर्ज असणाऱ्यांची १६ संख्या होती. त्यांचे प्रतिशत प्रमाण ५३.३३ टक्के इतके आढळून आले. रू. १००००० लाख पेक्षा जास्त कर्ज असणारे ०४ उत्तरदाते होते. त्याचे प्रतिशत प्रमाण केवळ १३.३३ टक्के इतके दिसून येते.

११) निवडलेल्या उत्तरदात्यांचे उत्पन्न २५००० रू. पेक्षा कमी असणाऱ्यांचे प्रमाण ८०.०० टक्के इतके होते.

१२) आत्महत्याग्रस्त कुटूंबांच्या वार्षिक उपभोग खर्चाबाबत विचारलेल्या प्रश्नावरून असे स्पष्ट होते की, ३०००० रू. पर्यंतचा वार्षिक उपभोग खर्च असणात्यांचे प्रतिशत ६६.६७ टक्के इतके सर्वाधिक दिसून येते.

## संदर्भ :-


१) काळे संभाजी, खंदारे विलास (२०१२), 'शेतकऱ्यांची आत्महत्या', अथर्व पब्लिकेशन्स जळगाव.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, नैसर्गिक आपत्ती विभाग, बुलडाणा २०१२.
३) जाधव नरेंद्र (२००८), विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या व शेतकरी पॅकेजची अंमलबजावणी संदर्भात अहवाल.
४) कऱ्हाडे बी. एम. (२०१११), शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
५) निकम अविनाश (२०१२), 'शेतकऱ्यांची आत्महत्याः आर्थिक मिमांसा', अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव.
६) ncrb.nic.in
७) दै. सकाळ.
८) महाराष्ट्र टाईम्स.
९) दै. लोकमत.